स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.**

---

पर्यावरणशास्त्र हा अनिवार्य अभ्यासक्रम ई–लर्निंग या पर्यायी सुविधेव्दारे राज्यातील सर्व महाविद्यालयात राबविण्याबाबत

## << परिपत्रक >>

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचे दि. ०७ जुन २०११ चा शासन निर्णय आपल्या माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करीत आहोत.

तरी ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ''ज्ञानतीर्थ'' परिसर | )( | |
| विष्णुपूरी, नांदेड - 431 606 | )( | |
| जा.क्र.शैक्षणिक/01/2011-2012/457 | )( | **संचालक** |
| **दिनांक : 23/07/2011** | )( | महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ |

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:</u>

1) प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापिठ.
2) कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
3) परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
4) उपकुलसचिव, पदव्युत्तर व पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

**पर्यावरण शास्त्र हा अनिवार्य अभ्यासक्रम ई-लर्निंग या पर्यायी सुविधेव्दारे राज्यातील सर्व महाविद्यालयात राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- एनजीसी - २०११/(१०२/११)/मशि-४,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक : ७ जून, २०११.**

**वाचा :-** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र. एनजीसी-२००९/(३९/०९)/मशि-३, दि. २९ ऑगस्ट, २००९

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र.एनजीसी -२०१०/(२०५/१०)/मशि-४, दि. ९ जुलै,२०१०.

३. संचालक उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.उशिसं/४००९/पर्यावरणशास्त्र/माअक-९४६५, दि. २४ मार्च,२०११.

**<u>प्रस्तावना :-</u>**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापिठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी पर्यावरण शास्त्र हा अभ्यासक्रम देशातील सर्व विद्यापिठातील पदवी अभ्यासक्रमांसाठी अनिवार्य विषय म्हणून लागू करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. विद्यापिठ अनुदान आयोगाने पर्यावरणशास्त्र हा अभ्यासक्रम अनिवार्य केला असला तरी, सदर विषयासाठी अनुदान तसेच नवीन पदे अनज्ञेय केलेली नाहीत. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पर्यावरणशास्त्र हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविणे आवश्यक असल्याने तो ई- लर्निंग सुविधेद्वारे उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यांना त्याचा स्वयं अभ्यास करण्यासाठी उपयोग होईल, हे विचारात घेऊन विद्यापिठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे लायकॉस टेक्नॉलॉजिज प्रा. लि. या नवी मुंबई स्थित कंपनीने तज्ञांचा गट स्थापन करुन अभ्यासक्रम तयार केलेला आहे.

वरील नमुद बाबी विचारात घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या तसेच विद्यापिठ अनुदान आयोगाच्या आदेशांचे पालन व्हावे आणि विद्यार्थ्यांना ई- लर्निंग सुविधेद्वारे पर्यावरणशास्त्र या विषयाच्या अध्ययनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संदर्भ क्र. १ येथील शासन आदेशाद्वारे लायकॉस टेक्नॉलॉजिज प्रा. लि. या कंपनीला हा अभ्यासक्रम ई- लर्निंग सुविधेद्वारे राज्यातील पाच शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये राबविण्यास काही अटींवर शासन मान्यता देण्यात आली होती.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही मान्यता लायकॉज टेक्नॉलॉजिज प्रा. लि. यांना दिल्यानंतर सन २०१०-११ मध्ये ही सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या पाच शासकीय महाविद्यालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध करुन दिली त्याचा अहवाल विचारात घेऊन संचालक, उच्च शिक्षण यांनी या सुविधेला विद्यार्थी व महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने या सुविधेची व्याप्ती वाढविण्याची शिफारस शासनाकडे केली होती. त्याअनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. २ येथील नमुद शासन आदेशाद्वारे सदर कंपनीस ही योजना राज्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शासन अनुदानित, कायमविनाअनुदानित (पारंपारिक, व्यावसायिक व अभियांत्रिकी) महाविद्यालयांमध्ये राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली होती.

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षामध्ये ही सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या तसेच विद्यापिठ अनुदान आयोगाच्या आदेशांचे पालन व्हावे आणि विद्यार्थ्यांना ई- लर्निंग सुविधेद्वारे पर्यावरणशास्त्र या विषयाच्या अध्ययनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षासाठी लायकॉस टेक्नॉलॉजिज प्रा. लि. या कंपनीला हा अभ्यासक्रम ई- लर्निंग सुविधेद्वारे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या राज्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शासन अनुदानित,

कायमविनाअनुदानित (पारंपारिक, व्यावसायिक, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी) महाविद्यालयांमध्ये त्याचप्रमाणे अभिमत विद्यापिठे, मुक्त विद्यापिठ व इतर विद्यापिठातील बाह्य अभ्यासकक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यास खालील परिच्छेद ३ येथील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील नमुद सर्व विद्यापिठे व महाविद्यालयांनी विद्यापिठ अनुदान आयोगाच्या पत्र क्र. एफ. १-१/२००८ (आर. ओ.), दि. ७ ऑगस्ट, २००८ नुसार पर्यावरणशास्त्र या अभ्यासक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**३. अटी :-**

१. पर्यावरणशास्त्र या अभ्यासक्रमाची उपत्ती (थेअरी ) सी. डी. च्या माध्यमातून सदर कंपनीद्वारे उपलब्ध करुन दिली जाईल.

२. प्रकल्प अहवाल/ प्रात्यक्षिकांसाठी कंपनीकडून शहरी, निमशहरी व ग्रामीण भागांसाठी पर्यावरणशास्त्राशी निगडीत वेगवेगळे प्रकल्प अभ्यास उपलब्ध करुन दिले जातील.

३. विद्यार्थ्यांनी निवडलेला प्रकल्प प्रत्यक्षात कसा राबवावयाचा या संबंधी तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन सदर सी. डी. मध्येच उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील, तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये काही किरकोळ अडचणी निर्माण झाल्यास ऑनलाईन/ ई- मेलद्वारे/ दूरध्वनीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सदर कंपनीची राहील.

४. ई- लर्निंग सुविधेचे शुल्क महाविद्यालयाच्या प्रवेशप्रक्रियेसोबत महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांकडून जमा करुन घ्यावे व संबंधित कंपनीकडे जमा करावे. महाविद्यालयाकडून जेवढया विद्यार्थ्यांचे शुल्क मिळेल तेवढया विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य २० कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांच्या आत कंपनी महाविद्यालयास वितरित करेल.

५. या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीचा अहवाल प्रत्येक शैक्षणिक सत्रामध्ये दोन वेळा सर्व संबंधित महाविद्यालयांनी संबंधित विभागीय सहसंचालकांमार्फत संचालकांना सादर करावा आणि संचालकांनी आपल्या अभिप्रायासह सदर अहवाल शासनास सादर करावा. संबंधित महाविद्यालयांनी अशा प्रकारे अहवाल सादर न केल्यास तो प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहिल.

हे शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०६०७१७४९५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सदाशिव शिवदास )**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व सहसचिव/ उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) कुलसचिव, सर्व विद्यापिठे , महाराष्ट्र राज्य. (अकृषि / तंत्र / अभिमत/ मुक्त).
८) प्राचार्य, संबंधित महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य. (संबंधित संचालकांमार्फत)
९) सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),
१०) निवड नस्ती मशि-४ कार्यासन.